महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपी मर्या.
(महाराष्ट्र शासा अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ २१९४०
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in
**दिनांक:- ०६.०८.२०१९**

# परिपत्रक

**विषय : मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०१९ रोजी मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे या दिवसाची "विशेष नैमित्तिक रजा" मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. विनैसु-१५१९/ प्र.क्र.९६/२९ दि. ३१ जुलै, २०१९.**

मंगळवार, दि. ०२ जुलै, २०१९ रोजी मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथे झालेल्या अतिवृष्टी पुरसदृश परिस्थिती, रस्त्यांवर पाणी तुंबणे, सर्व मार्गावरील रेल्वेची वाहतुक व्यवस्था बंद असणे, याभुळे मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथील शासकीय / निमशासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहणे शक्य नसल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन परिपत्रक क्र. विनैसु-१५१९ / प्र.क्र.९६/२९ दि. ३१ जुलै, २०१९ अन्वये **"विशेष नैमित्तिक रजा"** मंजूर केली आहे.

२. याबाबत, शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.९.२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी, मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथे झालेल्या अतिवृष्टी पुरसदृश परिस्थिती, रस्त्यांवर पाणी तुंबणे, सर्व मार्गावरील रेल्वेची वाहतुक व्यवस्था बंद असल्यामुळे महावितरण कंपनीच्या मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथील कार्यालयांमध्ये कार्यरत असलेले बहुसंख्य अधिकारी / कर्मचारी मंगळवार, दि.०२ जुलै, २०१९ रोजी कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत,अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांना मंगळवार, दि. ०२ जुलै, २०१९ रोजीची अनुपस्थिती **"विशेष नैमित्तिक रजा"** म्हणून मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

३. सदर परिपत्रक महावितरण कंपनीचे (Employee Portal (Mitra) / e-library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**